# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


प्रवेश सूचना

क्रमांक: २अ/एडीएम/अति.प्रवेश फेरी/२०१८/१०२५

दिनांक : 6 AUG 2018

## Admission Notice for B.Pharm/ Pharm D Additional Round for academic year 2018-19

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या तीन प्रवेश फे-या पूर्ण झालेल्या आहेत. मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासंदर्भात याचिका दाखल केलेली होती. सदरील याचिकेच्या संदर्भातील मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे आदेशाचे अनुषंगाने शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित संस्था व या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थामधील रिक्त जागा भरण्यासाठी या अतिरिक्त फेरीचे आयोजन करण्यात आलेले आहे. या फेरीचे सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| 1. | Display of Provisional Category wise Seats (Seat Matrix) for Additional Round | 07.08.2018<br>11.00 a.m. |
| 2. | Online Submission and Confirmation of Option Form for Additional Round | 07.08.2018 to 08.08.2018 |
| 3. | Display of Provisional Allotment of Additional Round | 09.08.2018 |
| 4. | Reporting to the Allotted institute and confirmation of Admission | 10.08.2018 to 11.08.2018 |

प्रवेश फेरीसंबंधी महत्वाच्या सूचना.

१. शासनमान्य प्रवेश नियमावलीनुसार या अतिरिक्त प्रवेश फेरीसाठी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी **अंतिम गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट** असलेले सर्व उमेदवार प्रवेशासाठी पात्र असतील.

२. या फेरीसाठी उपलब्ध असलेल्या शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित संस्था व या फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असलेल्या विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थामधील, त्यांनी या कार्यालयास उपलब्ध करून दिलेल्या रिक्त जागांची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३. अतिरिक्त फेरीमध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने विकल्प अर्ज भरणे आवश्यक आहे.

४. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झाल्यास अशा उमेदवारांचा त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला शासकीय, शासन अनुदानीत ,विद्यापीठ विभाग, विद्यापीठ संचलित संस्था व या फेरीमधील सहभागी विना अनुदानित औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थामधील प्रवेश आपोआप रद्द होईल व अशा रद्द झालेल्या जागेवर उमेदवाराचा कोणत्याही प्रकारे हक्क असणार नाही.

५. अतिरिक्त फेरीमध्ये जागेचे वाटप झालेल्या उमेदवारास त्यापूर्वीच्या फे-यांमध्ये मिळालेला प्रवेश हा या फेरीमध्ये सहभागी नसलेल्या विनाअनुदानीत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेतील असेल तर अशा विनाअनुदानीत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेतील प्रवेश रद्द करण्याची कार्यवाही उमेदवाराने स्वत: करणे आवश्यक आहे.

६. अतिरिक्त फेरीमध्ये प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी विहीत मुदतीमध्ये जागेचे वाटप झालेल्या औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये विहीत मुदतीत प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.अन्यथा सदरच्या जागेवर उमेदवार प्रवेशास पात्र असणार नाही.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई